पुढारी


# शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक लांबणीवर

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

कोरोनामुळे देशभर लॉकडाऊन करण्यात आल्याने दहावी, बारावी परीक्षा, निकाल त्याचबरोबर विद्यापीठ परीक्षांसह सीईटी प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक लांबणीवर पडणार आहे. याचा परिणाम म्हणून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येण्याची शक्यता आहे.

कोरोना विषाणूचा संसर्ग वाढू नये म्हणून खबरदारीचा उपाय म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २१ दिवसांचा लॉकडाऊन घोषित केला आहे. यापूर्वीच शाळा, महाविद्यालये राज्य सरकारने बंद केली आहेत. शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी पहिली ते आठवीपर्यंतच्या परीक्षा रद्द केल्या आहेत. नववी व अकरावीच्या परीक्षांचे अद्याप शाळा, महाविद्यालय स्तरावर नियोजन झालेले नाही.

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षा ३१ मार्चपर्यंत



पुढे ढकलण्यात आल्या आहेत. त्यातच पंतप्रधानांनी १४ एप्रिलपर्यंत लॉकडाऊन जाहीर केले आहे. अशा परिस्थितीत कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात न आल्यास आणखी अडचणीत भर पडण्याची शक्यता आहे. अद्याप विद्यापीठ प्रशासनाकडून परीक्षांचे नवीन वेळापत्रक तयार करण्यात आलेले नाही. त्यामुळे विद्यापीठ परीक्षांबाबत विद्यार्थी, पालकांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे.

**पुढील शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रिया विस्कळीत येणार**

विद्यापीठाच्या सुमारे ६८० परीक्षा दोन महिने चालतात. कोल्हापूर, सांगली, जिल्ह्यांतून सुमारे २ लाख ५० हजार विद्यार्थी परीक्षेला बसतात. परीक्षा झाल्यावर निकाल जाहीर करण्यासाठी ४० दिवसांचा कालावधी लागतो. या सर्व गोष्टी वेळेत न झाल्यास विद्यापीठ परीक्षा व त्यांच्या निकालाचा गोंधळ उडणार आहे.

याचा परिणाम पुढील वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेवर होऊन विस्कळीतपणा येण्याची शक्यता आहे.

## व्यावसायिक अभ्यासक्रमांचे वेळापत्रक कोलमडणार

लॉकडाऊनची घोषणा केल्यानंतर राज्याच्या सीईटी सेलने एमएचटी-सीईटी परीक्षा पुढे ढकलली आहे. या परीक्षेला कोल्हापुरातून हजारो विद्यार्थी बसतात. परीक्षा लांबणीवर गेल्याने अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, कृषी, एमबीए, विधी प्रथम वर्ष व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे वेळापत्रक कोलमडण्याची चिन्हे आहेत.

## विद्यापीठाचे 'नॅक' मूल्यांकन रखडणार?

शिवाजी विद्यापीठाची 'नॅक'ची मुदत संपली असून पुढील प्रक्रिया सुरू आहे. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता व हमी कक्षाने 'नॅक' बेंगलोरला डेटा व्हेरिफिकेशनचा अहवाल सादर केला आहे. त्यानंतर हा अहवाल 'नॅक'च्या समितीपुढे ठेवला जाऊन समिती पाहणी केली जाणार आहे. सद्य:स्थितीत देशभर लॉकडाऊन असल्याने नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया रखडण्याची शक्यता आहे.

Kolhapur Edition
27 Mar, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com